Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 14/05/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष



## स्वराज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज

स्वराज्याचे दुसरे छत्रपती, शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ पुत्र संभाजी महाराज हे अत्यंत पराक्रमी, साहसी राजे होते. त्यांचा जन्म १४ मे १६५७ रोजी पुरंदर किल्ल्यावर शिवाजी महाराज आणि त्यांच्या पहिल्या राणी सईबाई यांच्या पोटी झाला. त्यांना मराठी, संस्कृत, हिंदी, फारशी इत्यादी भाषा अवगत होत्या. त्यांनी बुधभूषणम, नखशिखा, नायिकाभेद असे ग्रंथ लिहिले. संभाजीराजांचा राज्याभिषेक १६ जानेवारी १६८१ रोजी झाला. छत्रपती संभाजी राजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर स्वराज्याला अधिकच बळकटी आली. स्वच्छ प्रशासन, उत्तम कारभार, दृढ निश्चय, अद्भुत आणि अचाट धैर्यशिलतेसाठी छत्रपती संभाजी महाराजांना ओळखले जाते. संभाजी राजांनी नऊ वर्षात २४० लढाया लढल्या.

संभाजी राज्यांनी पत्नीला प्रशासकीय हक्क, अधिकार, स्वतंत्र शिक्का देऊन राज्यकारभार करायला प्रोत्साहन दिले. स्वराज्याचा स्वतंत्र दारूगोळा कारखाना काढला. तरलता तोफखाना काढला. जंजिऱ्याजवळ पूल बांधला. नवी गावे वसवली. व्यापारी पेठा वसवल्या. धरणे बांधली. लढाईमुळे विस्थापित झालेल्यांचे पुनर्वसनही केले. आरमार वाढवून दर्यावर हुकमत निर्माण केली. चार नवे किल्ले बांधले. पराक्रमी सैनिकांना बक्षिसे दिली. लढाईत मारल्या गेलेल्यांच्या कुटुंबांची सोय केली. सैन्यदल अफाट वाढवले. तंजावर (कर्नाटक), मद्रास (मदुराई), पावणकोट, त्रिचनापल्ली (तमिळनाडू), पाटणा (बिहार), बंगालपर्यंत फौजा घुसवल्या. खजिना दुप्पट केला. शिवाजी महाराजांच्या राज्याचा विस्तार पाच हजार किलोमीटरपर्यंत वाढवला. हे सारे करण्यास त्यांना केवळ नऊ वर्षे मिळाली. त्यांचा कार्यकाळ अतुलनीय असाच आहे. ११ मार्च १६८९ रोजी पुण्याजवळ तुळापूर-वढू येथे संभाजी महाराज यांना क्रूरपणे मारण्यात आले.

Nashik Edition

May 14, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * YEOLA DIST. NASHIK * CENTRAL LIBRARY

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401